(CNRMHSN110009192022)

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३७४/२०२२ निशाणी ६ लगत सरतपास</u>**

फिर्यादीने आपल्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात पुराव्यात कागद दाखल करण्याबाबतचे कथन केलेले आहे. आरोपीचे वकील हजर आहेत. युक्तीवाद ऐकला.

सबब खालील आदेश करण्यात येतो –

**१२.** या कामी निशाणी ३/१ कडे फिर्यादीने धनादेश क्र.०८४३५६ सादर केलेला आहे. त्या धनादेशावरील आरोपीची सही त्याने ओळखली आहे व तो त्यांना दिला असल्याचे सांगितले आहे. (**सदर धनादेशाला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियम १८८१ चे कलम ११८ व १३९ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.१६ देण्यात येते**.) निशाणी ३/२ कडे धनादेश अनादरीत झाल्यामुळे मूळ धनादेशावरील मूळ मेमो सादर केला आहे. (**सदर मेमोला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियमचे कलम १४६ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.१७ देण्यात येते.)** निशाणी ३/३ कडे धनादेश परत आल्याबाबतची बाबासाहेब देशमुख सहकारी बँकेची स्लीप दाखल केली आहे. त्यावर बँकेचे अधिकारी यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.१८ देण्यात येते.)**

**१३.** तसेच कामी निशाणी ३/४ कडे आरोपीस पाठवलेल्या नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यावरील सही फिर्यादीने ओळखलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.१९ देण्यात येते.)** निशाणी ३/५ कडे आरोपी पाठवलेल्या नोटीसची पोस्टाची पोहोचपावती दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.२० देण्यात येत आहे.)**

**<u>आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत</u>**

(CNRMHSN110009192022)

**तहकूब**

VINAYAK DATTATRAY PATIL

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2023.01.19 12:49:48 +0530

आटपाडी (वि. द. पाटील)

दिनांक : १८/०१/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी